# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## निगडी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड
## तपास पथकाची कामगीरी २४ तासाच्या आत दरोडयातील गुन्हयामधील आरोपी अटक

**निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ४२/२०२० भा.दं.विकलम ३९५,३२३,५०६ आर्म अॅक्ट कलम ४ (२५), पब्लीक प्रॉपट्री डॅमेज अॅक्ट ३,४,क्रिमीनल लॉ अमेंडमेंट अॅक्ट कलम ७,महाराष्ट्र पोलीस अॅक्ट कलम ३७(१)(३) सह १३५,**

दि.०२/०२/२०२० रोजी पहाटे ०४/०० वा.चे.सुमारास आंबेडकरनगर थरमॅक्स चौक कुंदन हुंदाई शोरुम समोर चिंचवड पुणे या ठिकाणी रोहित चंद्रकांत मुद्दे व इतर पाच साथीदार यांनी फिर्यादीस मारहाण करुन कोयत्याचा धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी देवुन त्याचे खिशातील १६०० रुपये बळजबरीने काढुन घेतले. फिर्यादीचा टेम्पो व तसेच परिसरात लावलेले वाहने त्यामधील ५ मोटार सायकल, ६ थ्री व्हीलर, अशा वाहनांची तोडफोड करुन सुमारे ४०,०००/- रु. चे नुकसान केले. सदर आरोपीत हे पळुन गेले. सदर गुन्हयाच्या अनुंषगाने पोलीस स्टेशन हद्दीत तपास करीत असताना **पोहवा/ किशोर पढेर** यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की सदर गुन्हयातील आरोपी हे दुर्गा नगर चौकातील सी.एन.जी.गॅस पंपाचे समोर थांबलेले आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी मा.पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ यांनी मा.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक निगडी पोलीस स्टेशन पोना/ढोले, पोना/केकाण,पोना/मावसकर ,पोशि/ मिसाळ ,पोशि/चौधरी व पोलीस उप निरीक्षक माकणे, सपोफौ बांगर, पोहवा/पढेर, पोशि/गेंगजे, पोशि/साळुखे, पोशि/बोडके, यांचे खास पथक तयार करुन बातमी प्रमाणे सापळा लावला व बातमी प्रमाणे खात्री करता तेथे पेट्रोलपंपाच्या आडबाजुस संशयीत दोन इसम थांबलेले दिसले सोबतचे स्टाफने पाठलाग करुन सदर दोन इसमांना पकडले व पकडलेल्या इसमांचे नाव व पत्ता विचारता त्यांनी त्याचे नाव **१) राहुल रामचंद्र दौंड वय-३०वर्षे रा. बि.नं.११ रुम. नं.४ अंजठा नगर चिंचवड पुणे २) रोहीत आश्रुबा आव्हाड वय -२१वर्षे रा. गती कंपनी समोर अंजठानगर चिंचवड पुणे** असे असल्याचे सांगितले.सदर आरोपीना पोलीस स्टेशन येथे आणुन गुन्हयाच्या तपासाच्या अंनुषंगाने विचारपुस करता त्यांना सांगितले की, सदर गुन्हा करताना आम्ही व आमचे साथीदार नामे **३) रोहीत चंद्रकांत मुद्दे ४) आकाश चंद्रकांत** मुद्दे दोघे रा.आंबेडकर नगर हुंदयाई शोरुम समोर चिंचवड पुणे **५) हरुण नाशीर शेख रा. घरकुल चिखली पुणे** असे सांगितले आरोपी क्र.१ व २ यास दि.०२/०२/२०२० रोजी २२/३० वा.सुमारास अटक करण्यात आले.त्यानंतर इतर पाहीजे असलेले आरोपी बाबत हद्दीत तपास करीत असताना **पोना/सतिश ढोले** यांना गुप्त बातमीदारमार्फत बातमी मिळाल की पोहीजे असलेले आरोपी रोहीत मुद्दे हा सुभाष नगर बार्शी येथे असलेले सांगितले.सदरची बातमी मा.पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ यांना सांगून त्यांच्या आदेशाने बार्शी जि.सोलापूर येथे पोलीस उप निरीक्षक लोंखडे त्याचे सोबत पोहवा/पढेर, पोना/ढोले, पोशि/साळुंखे असे खाजगी वाहनाने जावून तेथून बार्शी पोलीस स्टेशन येथील पोलीस मदत घेवून सुभाष नगर बार्शी येथून रोहीत यास ताब्यात घेवून निगडी पोलीस येथे आणले. व सहा पोलीस निरीक्षक एल.एन.सोनवणे सोबत सपोफौ बांगर, पोना/केकाण, पोना/मावसकर, पोना/व्होनमाने पोशि/मिसाळ, हद्दीत तपास करीत असताना **पोशि/अमोल साळुंखे** यांच्या गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की आकाश मुद्दे हा बालाजी नगर भोसरी येथे असल्याचे सांगितले त्यावेळी सदर बातमी वरिष्ठ यांना कळवून सदर ठिकाणी एल.एन.सोनवणे, स.पो.नि. यांची टिम असे खाजगी वाहनाने जावून आकाश मुद्दे यास सापळा रचुन बालाजीनगर, भोसरी येथे पकडले त्यास ताब्यात घेवून पोलीस स्टेशन येथे आणलेले सदर आरोपी क्र. ३ व ४ यांना आज दि.०३/०२/२०२० रोजी ११/३० वा. अटक केली आहे. **सदरची कामगिरी सदरची कामगिरी मा.संदीप बिष्णोई पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड,मा.श्री रामनाथ पोकळे अप्पर पोलीस आयुक्त सो, मा.स्मिता पाटील पोलीस उप-आयुक्त सो परि-१, हे गुन्हा घडलेपासुन प्रत्यक्ष हजर राहुन वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन करुन मा.श्री.राम जाधव सहा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली निगडी पोलीस स्टेशन कडील श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक निगडी पोलीस स्टेशन पुणे, श्री.राजेंद्र निकाळजे, पोलीस निरीक्षक(गुन्हे) पिंपरी पोलीस स्टेशन, सहा पोलीस निरीक्षक, श्री.एल.एन.सोनवणे,, श्री.प्रशांत आरदवाड, पोलीस उपनिरीक्षक, श्री,पी.आर.लोंखडे, श्री. के.बी.माकणे, सपोफौ/शंकर बांगर, पोहवा/ किशोर पढेर, पोना/सतिश ढोले, पोना/विलास केकाण, पोना/रमेश मावसकर, पोना/विनोद व्होनमाने, पोना/चंद्रकांत वाघमारे, पोशि/अमोल साळुंखे, पोशि/भुपेंद्र चौधरी, पोशि/विजय बोडके, पोशि/राहुल मिसाळ, पोशि/तुषार गेंगजे यांनी केली आहे.**

SS

